## प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)
(०२३५८) २८२३८७

अंक २०/२०१० | दिनांक ०९/०३/२०१० | कालावधी ५ दिवस

| मागील हवामान सारांश दि. ०४/०३/१० ते ०८/०३/१० | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ०.० |
| पाऊस (मिमी) १/१/१० पासून | : | ०.० |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | ०.० |
| कमाल तापमान (अं.से) | : | २९.९–३२.० |
| किमान तापमान (अं.से) | : | १५.०–१६.१ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (:%) | : | ८०–९८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%:) | : | ५६–६७ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ४.२–५.६ |

| हवामान पूर्वानुमान (०९.०३.२०१० सकाळी ८:३० पासून १३.०३.२०१० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३३ | ३५ | ३५ | ३६ | ३६ |
| किमान तापमान (अं.से) | : | २२ | २२ | २४ | २४ | २६ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ० | १ | १ | २ | ४ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%:) | : | ८५ | ८६ | ८५ | ८५ | ८४ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (:%) | : | ४१ | ३९ | ३५ | ३५ | ३८ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ०११ | ००९ | ००४ | ००६ | ००७ |
| वाऱ्याची दिशा | : | द. | आ.द. | आ.पू. | ई.उ. | ई. |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

कमाल तापमान दि. ०९.०३ रोजी ३३° से., **१०.०३ व ११.०३ रोजी ३५° से. आणि १२.०३ व १३.०३ रोजी ३६° से.** इतके. तर किमान तापमान दि ०९.०३ व १०.०३ रोजी २२° से., ११.०३ व १२.०३ रोजी २४° से आणि १३.०३ रोजी २६° से. असे राहील. वातावरण दि. ०९.०३ रोजी स्वच्छ सूर्यप्रकाशीत आणि १०.०३ ते १३.०३ पर्यत अंशत: मेघाच्छादित राहील. वाऱ्याच्या वेगात ०९.०३ व १०.०३ रोजी वाढ संभवते.

| | |
|---|---|
| **भुईमूग, मका** | भुईमूगाचे पीक आऱ्या येण्याच्या व शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहे. मक्याची कणसे तयार होण्याच्या अवस्थेत आहेत. त्यामुळे त्यांना आवश्यक्तेनुसार पाणी द्यावे. भुईमूगाचे पिकावरून रिकामे पिंप फिरविल्यामुळे जमिनीत घुसणाऱ्या आऱ्यांची संख्या वाढते व शेंगांची संख्या वाढून उत्पन्न वाढते. |
| **भाजीपाला कडधान्य** | कडधान्य पिकांवरील शेंगा पोखरणाऱ्या अळीसाठी खाली दिल्याप्रमाणे उपाययोजना करावी. कडधान्यपिके कापणीस तयार झाल्यावर शेंगा पिवळसर रंगाच्या दिसू लागतात, पाने वाळतात व गळतात. अशा काढणीयोग्य शेंगांची काढणी सकाळचेवेळी उपटून किंवा कापून करावी. उशिरा व कडक उन्हात तोडणी करू नये. अन्यथा शेंगा तडकून उत्पन्नात घट होते. काढलेल्या शेंगा व्यवस्थित सुकवून साठवाव्यात. कलींगडाची फळे तयार होण्याच्या अवस्थेत आहेत. तयार फळांच्या देठाजवळील लतातंतू सुकलेले असतात व त्यांचा जमिनीलगतचा रंग पिवळसर होतो. अशा तयार फळांची काढणी करावी व ती सावलीत ठेवावीत. सूर्यप्रकाशामुळे फळे तडकू नयेत म्हणून भाताच्या पेंढयाने किंवा गवताने झाकावीत. . |
| **आंबा, काजू** | आंब्यामध्ये वाटाण्याएवढी व सुपारीएवढी फळे झाली आहेत. फळांची वाढ चांगली होण्यासाठी २० पी. पी. एम्. नॅप्थॅलिक ॲसिटिक ॲसिड या संजीवकाची फवारणी करावी. कमाल व किमान तापमानात पुढील पाच दिवसात वाढ संभवते. जास्त तापमानामुळे फळगळ होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शक्य असल्यास प्रति झाड १५० ते २०० लिटर पाणी द्यावे. अशा पंधरा दिवसांचे अंतराने पाण्याच्या ३ ते ४ पाळया द्याव्यात. तसेच फळधारणा झाल्यावर २ टक्के युरिया (२०ग्रॅम/लिटर) कीटकनाशकांचे द्रावणात पूर्णपणे मिसळून फवारावे. त्यामुळे फळगळ कमी होते व फळांची वाढ चांगली होते. वातावरण बदलामुळे आंब्यावर काही ठिकाणी फुलकीडींचा तसेच कोळयांचा प्रादुर्भाव आढळला आहे. फुलकीडे कोवळी पाने, मोहोराचे दांडे आणि फळांची साल खरवडून आतील रस शोषतात. त्यामुळे पाने वेडीवाकडी होतात व गळतात, मोहोराचे दांडे व मोहोर सुकून काळा पडतो व त्याची गळ होते. फळांची वाढ खुंटते, प्रत बिघडते व फळगळ होते. कोळी कीड पानांच्या मागील बाजूस जाळी तयार करते व पानातील रस शोषून घेते परीणामी पाने निस्तेज, वेडीवाकडी होतात व मोठया प्रमाणावर पानगळ होते. याचा मोहोरावर व फळधारणेवर अनिष्ट परीणाम होतो. काजूमधील काढणीयोग्य बिया गोळा करून ३ ते ४ दिवस उन्हात वाळवाव्यात व पोत्यात भरून ठेवाव्यात. काजूच्या मोहोरावर व छोटया बियांवर ढेकण्याचा तसेच फुलकीडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी बागेची नियमित पहाणी करावी व खाली सुचविल्याप्रमाणे उपाययोजना करावी. |
| **नारळ** | नारळाच्या पाच वर्षे व त्यापुढील वयाच्या रोपांना प्रत्येकी ७५०ग्रॅम युरीया (नत्र) व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश (पालाश) असा तिसरा हप्ता द्यावयाचा राहिला असल्यास द्यावा व लगेच पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **दुभती जनावरे** | जनावरांमधील संभाव्य रोगासाठी पशुवैद्यांचे सल्ल्याने उपाययोजना करावी. जनावरांना हिरवा चारा व नियमित स्वच्छ पाणी देण्याची व्यवस्था करावी. पुढील पाच दिवसात तापमानात वाढ संभवते. त्यामुळे जनावरांना योग्य प्रमाणात पाण्याचा पुरवठा करावा. जनावरांचे गोठे स्वच्छ ठेवावेत. |
| **शेळया व कुकुटपालन** | शेळया व कोंबडयांमधील संभाव्य रोगांसाठी पशुवैद्यांचे सल्ल्याने उपाययोजना करावी. शेळयांमध्ये जतांचा प्रादुर्भाव संभवतो. त्यांना अलबेंडाझॉल ५ मि. ग्रॅम प्रति किलो वजनास या प्रमाणात द्यावेत. शेळयांना तीन ते चार किलो प्रति दिन प्रति शेळी हिरव्या चाऱ्याची व्यवस्था करावी. पुढील पाच दिवसात तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेडमध्ये हवा खेळती राहील असे पहावे व त्याना योग्य प्रमाणात पिण्यासाठी पाणी द्यावे. |
| **मत्स्यपालन** | तळयातील माशांची संख्या व वाढ तसेच पाण्याची वेळोवेळी तपासाणी करावी. तळयातील माशांसाठी नैसर्गिक खाद्याबरोबर पूरक खाद्य म्हणून शेंगदाणा पेंड, भाताचा कोंडा किंवा गव्हाचा कोंडा एकास एक प्रमाणात मिसळून पाण्यात भिजवून दिवसातून दोन वेळा द्यावे. |
| **सूचना** | निरनिराळे किड रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकचे कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांना भेटावे. |

| पिकाचे नाव | कीडीचे/ रोगचे नाव | फवारणी | औषधाचे नाव व १० लिटर पाण्या साठी प्रमाण | शेरा |
|---|---|---|---|---|
| आंबा | तुडतुडे | ४ थी फवारणी तिसऱ्या फवारणीनंतर सुमारे दोन आठवडयांनी | एण्डोसल्फान ३५६ टक्के प्रवाही १५ मिली. | ही फवारणी मोहोरातील फुले उमललेली असल्यामुळे अतिआवश्यक असल्यास करावी. |
| | | ५ वी फवारणी चौथ्या फवारणीनंतर सुमारे दोन आठवडयांनी | फोझॅलॉन ३५ टक्के प्रवाही १५ मिली किंवा फेन्थोएट ५० टक्के प्रवाही १० मिली किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही २० मिली | भुरी रोगाचे नियंत्रणासाठी या फवारणीचे वेळी कीटकनाशकाच्या द्रावणातुन २० ग्रॅम पाण्यात मिसळणारे गंधक किंवा १० ग्रॅम कार्बेन्डझिम किंवा ५ मिली हेक्झॅकोनॅझोल मिसळावे. |
| | | ६ वी फवारणी पाचव्या फवारणीनंतर सुमारे दोन आठवडयांनी | मोनोक्रोटोफॉस ३५ टक्के प्रवाही ११ मिली | ही फवारणी आवश्यकता वाटल्यास करावी. |
| | फुलकीड | फिप्रोनिल २० मिली अधिक डायमेथोएट १५ मिली किंवा फिप्रोनिल २० मिली अधिक स्पिनोसॅड ५ मिली | | प्रादुर्भाव आढळयास फवारणी ताबडतोब करावी. जास्तीत जास्त १० दिवसांचे अंतराने किमान दोन फवारव्या कराव्यात |
| | कोळी | पाण्यात मिसळणारे गंधक २० ग्रॅम | | फवारणी पानाचे मागील बाजूने सकाळी व सायंकाळी करावी. |
| काजू (मोहोर) | ढेकण्या, | एण्डोसल्फान ३५ टक्के प्रवाही १५ मिली. | | ही फवारणी मोहोरातील फुले उमलण्या अगोदर करावी. |
| बी अवस्था | फुलकीडे | कार्बारिल ५० टक्के २० ग्रॅम किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मिली | | प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असल्यास आवश्यकता वाटल्यास फवारणी करावी. |
| कडधान्ये | शेंगा पोखरणारी अळी | क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली किंवा फेन्थोएट ५० टक्के प्रवाही १४ मिली | | |